International Journal for Multidisciplinary Research
International Conference on Multidisciplinary Research & Studies 2023
E-ISSN: 2582-2160 ● Website: www.ijfmr.com ● Email: editor@ijfmr.com

# शैक्षणिक व संशोधन ग्रंथालये

सौ.रुपाली मनिष गुल्हाने

सहाय्यक ग्रंथपाल,(M.Lib), स्कूल ऑफ स्कॉलर्स,यवतमाळ

प्रस्तावना :-

संशोधन म्हणजे एखादी नवीन गोष्ट शोधणे होय. कोणत्याही विषयाचा विकास हा त्या विषयाचा अभ्यास आणि त्या विषयातील संशोधन यावर अवलंबून असतो. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र चा विकास त्या विषयातील अनेक वर्षातील संशोधनाचा परिणाम आहे.

एखाद्या नवीन संशोधनानंतर त्याचा वापर मानवी जीवनात कसा करता येईल याचा नेहमी मानवाने अभ्यास केला पाहिजे. संशोधनाचे अस्तित्व ग्रंथालयापासून असू शकत नाही तसेच ग्रंथालय आणि माहितीशास्त्र संशोधनाचा अभ्यास करताना सूक्ष्म रूपाने लक्ष देणे आवश्यक आहे. संशोधन बहुदा वैज्ञानिक विचार म्हणून परिभाषित केले जाते. ग्रंथालय व माहिती शास्त्रामध्ये शैक्षणिक व संशोधन ग्रंथालय या विषयावर संशोधन केले आहे.

परिचय :-

शैक्षणिक ग्रंथालय ही संशोधन ग्रंथालय असतात व उलट संशोधन ग्रंथालय ही शैक्षणिक ग्रंथालय असतात. शैक्षणिक ग्रंथालयाचे मूलभूत कार्य शैक्षणिक आहे आणि संशोधन ग्रंथालयाचे मूलभूत कार्य् निव्व्ळ संशोधनास मदत करणे होय. शैक्षणिक ग्रंथालयात शालेय ग्रंथालयाचा अंतर्भाव सर्वत्रच केला जातो हे साहाजीकच आहे. कारण, शिक्षण शाळेपासून सुरू होते व म्हणूनच शालेय ग्रंथालय हे शैक्षणिक ग्रंथालयच होय या विचारसरणीमध्ये काही चूक नाही. तथापि, अधिक सफल विचार केल्यास महाविद्यालयीन व विद्यापीठ ग्रंथालयाच्या कार्यामध्ये जी समानता भासते व त्या दोघांच्या कार्याचे जे स्वरूप आढळते ते शालेय ग्रंथालयाच्या कार्यापेक्षा भिन्न आहे.

महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांनी स्वयं अध्ययन करावे अशी अपेक्षा असते. स्वयं अध्ययनासाठी विद्यार्थी ग्रंथालयाची मदत घेऊ शकतात. महाविद्यालयीन आणि विद्यापीठ ग्रंथालय त्याच्या विविध सेवाद्वारे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मदत करतात. संशोधकांचा पाहिजे असलेला वाचन साहित्य, माहिती वेळेवर उपलब्ध करून ही ग्रंथालय संशोधनातील भागीदारी बनतात. महाविद्यालयीन व विद्यापीठ ग्रंथालय प्रामुख्याने उच्च शिक्षणाशी संबंधित आहे. या ग्रंथालयाचे उच्च शिक्षणातील महत्व अभ्यासण्यापूर्वी शिक्षणशी संबंधित काही संकल्पना अभ्यासणे योग्य होईल.

शिक्षणाचे चार प्रमुख हेतू आहेत.

१) नवीन ज्ञान देणे :-

जसे इतिहास, भूगोल, विज्ञान, गणित सारख्या विषयाचे मूलभूत ज्ञान शाळेत दिले जाते.

२) कौशल्य् विकसित करणे:-

लेखन वाचन, टंकलेखन, व्याप्ती ,रुंदी, इमारत बांधणी आदी कार्य् अचूक करण्यासाठी काही कौशल्याची आवश्यकता आहे शिक्षणाच्या माध्यमातून ही कौशल्य विकसित केली जाते.

३) दृष्टिकोन वृत्ती विकसित करणे :-

अभ्यासकांमध्ये योग्य प्रकारचा दृष्टिकोन निर्माण करणे हाही शिक्षणाचा हेतू असतो. ग्रंथालयाद्वारे वाचकांची सेवा करण्याची वृत्ती विकसित होते.

४) मुल्ये व त्याचे महत्त्व सांगणे :-

समाज उपयोगी, समृद्ध जीवन जगण्यासाठी काही मूल्ये अवलंबवावी लागतात. ही मूल्ये त्यांचे महत्त्व अभ्यासकांना / समाजाला समजावून सांगणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट असते.

महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालयाचे शैक्षणिक महत्त्व :-

शिक्षण प्रक्रियेत ग्रंथालयांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. युनिव्हर्सिटी एज्युकेशन कमिशनचे अध्यक्ष डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्ण यांचे मतानुसार विद्यापीठातील सर्व कार्याचा केंद्रबिंदू ग्रंथालय आहे. संशोधनामध्ये आणि शैक्षणिक उपक्रमामध्ये विद्यापीठीय ग्रंथालय महत्त्वाचे भूमिका निभावते. विज्ञानातील संशोधनासाठी प्रयोगशाळा आणि ग्रंथालयाची आवश्यकता असते.

संशोधन या शब्दाचा अर्थ शोध लावणे असा आहे. म्हणूनच प्रा. बर्णाल यांनी असे म्हटले आहे की, "सध्याच्या शतकात एखाद्या शास्त्रज्ञाने नवीन शोध लावणे फारसे अवघड नाही. परंतु तसाच शोध अन्य शास्त्रज्ञांनी इतर एखाद्या अन्य ठिकाणी अन्य प्रकारच्या वाङ्मयात यापूर्वी नमूद केला आहे. हे शोधणे कठीण नव्हे, अशक्य आहे."

संशोधन ग्रंथालयाचे स्वरूप :-

संशोधन ग्रंथालय हे इतर ग्रंथालयापेक्षा वेगळे असते हे उघड आहे. आपणास ग्रंथालयाचे परिचित असलेले इतर प्रकार पुढीलप्रमाणे सांगता येईल.

- राष्ट्रीय ग्रंथालये
- राज्य पातळीवरील मध्यवर्ती ग्रंथालये
- सार्वजनिक ग्रंथालये
- वर्गणी ग्रंथालये
- विद्यापीठ ग्रंथालये
- उच्च् शैक्षणिक तथा संशोधन संस्थेचे ग्रंथालये
- विशेष प्रकारचे शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांची ग्रंथालये
- महाविद्यालय ग्रंथालये
- उच्च माध्यमिक तथा शालेय ग्रंथालये
- उद्योग व्यवसायातील ग्रंथालये
- विशेष ग्रंथालये

संशोधन ग्रंथालय स्वरूप स्थूलमानाने समजून घेण्यास त्याचा थोडक्यात परिचय करून घेऊ या.

१. ग्रंथालय समिती :-

अत्यंत महत्त्वाचे विभागाची आकारणी, व्यवस्थापन व सेवा या सुव्यवस्थीत असण्यासाठी ग्रंथालय समिती ही उच्चाधिकार समिती समानच असली पाहिजे. संस्थेतील सदस्यांना तसेच वरिष्ठ संशोधक यांचा त्यात समावेश हवा. इतर ग्रंथालयीन समिती प्रमाणे किंवा धोरणात्मक निर्णय घेणारी नसून धोरणात्मक तसेच दैनंदिन व्यवस्थापनात्मक बाबी देखील ठरवणारी समिती असणे आवश्यक आहे. कारण व्यवस्थापनातील प्रत्यक्ष बाब हे संशोधन कार्याशी संबंध ठेवणारी असेल.

२. ग्रंथालयाचे स्थान :-

ग्रंथालयाचे परिसरातील स्थान इतर ग्रंथालयाच्या निकषानुसार न ठरता दैनंदिन व्यवहारासाठीच्या जागेपासून दूर शांत वातावरणात असेल तिथे तळमजल्यावर वा पहिल्या मजल्यावर असावी. शांत वातावरण असने हा महत्वाचा मुद्दा आहे.

३. ग्रंथालयाची जागा :-

ग्रंथालयासाठी विस्तृत जागा तर हवीच परंतु या ग्रंथालयापासूनच काहीही साहित्य काढले जात नाही हे वैशिष्ट्य लक्षात घेऊन भावी विस्तारासाठी सहज सोय उपलब्ध असणे आवश्यक आहे.

४. फर्निचर :-

ग्रंथ साहित्य वेगवेगळ्या स्वरूपाच्या असणार आहेत. या दृष्टीने त्याची मांडणी व निगा याकरिता लोखंडी, लाकडी व प्लास्टिक अशा विविध स्वरूपाचे असावे. वेगवेगळे आकार उपलब्ध होतील अशी रचना असावी. संगणक व्यवस्थीतपणे हाताळता येतील असे सोयीचे फर्निचर असावे.

५. सुविधा व उपकरणे :-

ग्रंथालय वातानुकूलित असणे ही बाब आवश्यक आहे. वाचक आणि कर्मचारी यांना होईल अशी व्यवस्था ग्रंथालयात असणे आवश्यक आहे.

६. वाचन साहित्य :-

संशोधक ग्रंथालयातील वाचन साहित्य इतर साहित्य पेक्षा बहुतांशी वेगळी असते. पारंपारिक ग्रंथ व नियतकालिके विविध प्रकारचे पुस्तके आदी प्रकारची वाचन साहित्य ग्रंथालयामध्ये असणे आवश्यक आहे.

७. वाचन साहित्य निवड पद्धती :-

इतर सर्व ग्रंथालयापेक्षा वाचन साहित्य निवडीमध्ये पद्धती वेगळी असते. यात वाचकाचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असतो. ग्रंथपाल पुर्वनुभावानेच निवड करू शकतो. पण बहुतांशी त्याची भूमिका सहाय्यकाची असते.

८. वर्गीकरण :-

संशोधन कार्यातील वर्गीकरण केवळ सूक्ष्म असते असे नाही तर आवश्यक वाटल्यास प्रचलित वर्गीकरण पद्धतीत फेरबदल करावे लागतात.

९. तालिकिकरण :-

साहित्याच्या स्वरूपावर लक्षात येईल की या ग्रंथालयातील ग्रंथाचे तालिकीकरण जितके जास्त माहिती देणारे पूरक नोंदणीकृत करता येईल तेवढे ते करावे.

१०. देवघेविचे स्वरूप :-

संशोधन ग्रंथालयात देवघेवी मध्ये जेवढे अनौपचारिकता असेल तेवढे चांगले.

११. वेळा :-

संशोधन ही वेळेच्या बंधनात न अडकणारे प्रक्रिया आहेत. त्यामुळे ग्रंथालय सेवेसाठी वेळेचे कडक बंधन असून चालत नाही. प्रथम ग्रंथालय जितके जास्त वेळ उघडे असेल तेवढे चांगले.

१२. ग्रंथालयाचे नियम :-

ग्रंथालय ही संस्था आहे व कोणतीही संस्था नियमाशिवाय चालविताच येणार नाही. यात शंकाच नाही विशेषत: संशोधन ग्रंथालयात हे आवश्यक असते. संशोधन ग्रंथालयात विलंब शुल्क् वा पुस्तके उशिरा परत करण्याकरिता दंड मुळीच करू नये.

१३. निगा :-

ग्रंथ साहित्याच्या स्वरूपावरूनच लक्षात येईल की त्याची निगा राखण्यासाठी ग्रंथालयात विशेष प्रयत्न लागतात. कागद फिल्म इत्यादी विविध प्रकारच्या साहित्यासाठी संशोधकाचे मार्ग वेगवेगळे हवे हे उघड आहे.

१४. वाचन कक्ष :-

या ग्रंथालयातील वाचन कक्षात दोन-तीन प्रकारच्या सोयी असणे आवश्यक आहे. खुर्च्या, नियतकालिके, ग्रंथ साहित्ये, हस्तलिखिते, जुने साहित्य नीट वाचता येईल त्यासाठी बहिर्वक्र भिंग आदी असणे आवश्यक आहे.

१५. सेवक वर्ग :-

सेवक वर्ग हा सेवाभावी, जाणकार ग्रंथपालन शास्त्रात पारंगत असणे इत्यादी त्याची खास वैशिष्ट्ये असलेला असावा.

१६. मूल्यमापनाचे निकष :-

संशोधन ग्रंथालयाच्या मूल्यमापनाचे निकाल सर्वस्वी वेगळे असतील. ग्रंथसंग्रहाच्या गुणवत्तेचे निकष, सेवांची निकष ग्रंथालयाच्या उपाययोजकबाबतचे निकष वेगळेच असतील हे उघड आहे.

अशाप्रकारे संशोधन ग्रंथालयाच्या वरील विवेचनावरून संशोधन ग्रंथालयाच्या स्वरूपाबद्दल कल्पना येईल.

संशोधन ग्रंथालयाचे प्रकार :-

कोणती दोन संशोधन ग्रंथालय एकसारखी नसतात. कारण, प्रत्येक विषयाचे वैशिष्ट्य वेगळे असते व त्याच्या संशोधन विषयक बाबी देखील वेगवेगळ्या असतात. संशोधन ग्रंथालयाचे तीन प्रकार पडतात.

१. मातृसंस्था संलग्न संशोधन ग्रंथालये

२. संशोधन संलग्न् कार्य असलेली ग्रंथालये

३. स्वतंत्र अस्तित्व असलेली ग्रंथालये

`

सारांश :-

संशोधक ग्रंथालय हे इतर ग्रंथालय सारखेच असल्याचे दिसते. पण संशोधन ग्रंथालयातील विविध सेवा ग्रंथालयाची मांडणी, वाचन साहित्य प्रकार, व्यवस्थापन प्रणाली इतर बाबीचा विचार केल्यास संशोधन ग्रंथालय हे इतर ग्रंथालयापेक्षा वेगळे जाणवते.

संदर्भ सूची :-

1. बोधनकार, सुधीर कॉलनी, विवेक सामाजिक संशोधन पद्धती, नागपूर, साईनाथ प्रकाशन, १९९९.
2. विर. डी.के., ग्रंथालय संघटना, मराठवाडा विभाग, ग्रंथालय संघ, औरंगाबाद, २००१
3. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, महाविद्यालयीन व विद्यापीठ ग्रंथालये.
4. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, संशोधन ग्रंथालये.